# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## स्वातंत्र्यदिन सोहळा

सकाळ
शनिवार, १८ ऑगस्ट २०१८ | ५

### राजगुरुनगरला विद्यार्थ्यांची प्रभातफेरी

राजगुरुनगर, ता. १७ : राजगुरुनगरला स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

तहसीलदार कार्यालयात शासकीय ध्वजवंदन सहायक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र टोंपे, तहसीलदार अर्चना यादव, पोलिस निरीक्षक अरविंद चौधरी, गटविकास अधिकारी इंदिरा अस्वार, नायब तहसीलदार राजेंद्र जाधव, राजेश कानसकर, बी. बी. बोडके, मुख्य कार्यकारी अधिकारी मच्छिंद्र घोलप, कार्यकारी अभियंता भास्कर क्षीरसागर, भूमिअभिलेख उपअधीक्षक उमेश झेंडे, तालुका कृषी अधिकारी लक्ष्मण होटकर, वनपरिक्षेत्र अधिकारी एस. डी. चव्हाण उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात संचलन करताना एनसीसीचे छात्र.

हुतात्मा राजगुरुवाड्यामध्ये आणि गावाच्या वेशीवर नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, खेड बाजार समितीत सभापती चंद्रकांत इंगवले, राजगुरुनगर बँकेत अध्यक्ष गणेश थिगळे, पंचायत समितीमध्ये सभापती सुभद्रा शिंदे, सार्वजनिक वाचनालयात सचिव राजेंद्र सुतार यांच्या उपस्थितीत ध्वज फडकविण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या क्र.१ व क्र. २ शाळांनी प्रभातफेरी काढली. महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बँडपथकासह गावातून प्रभातफेरी काढली. विद्यालयात अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर यांच्या उपस्थितीत झेंडावंदन झाले. या वेळी तंबाखूमुक्त अभियानाची शपथ देण्यात आली. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पटील यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन केले.

केसरी पुणे, १७ ऑगस्ट २०१८

### राजगुरुनगर शहरात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

राजगुरुनगर, (वार्ताहर) : राजगुरुनगर शहरात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. तहसिल कार्यालय येथे शासकीय ध्वजारोहण प्रांताधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते झाले. यावेळी तहसिलदार अर्चना यादव, नायब तहसिलदार राजेश कानसकर, राजेंद्र जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे व नागरीक उपस्थित होते. नगरपरिषद इमारत व गावच्या वेशीवर तसेच राजगुरु जन्मस्थळ स्मारक येथे नगराध्यक्ष शिवाजी मांदळे यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक एकच्या विद्यार्थ्यांनी व स्काऊट पथकाने मानवंदना दिली. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक द. मा.पिंगळे उपस्थित होते. स्वातंत्र्यसैनिक व माजी सरपंच (कै.) मोरेश्वर सुतार यांच्या वाड्यावर शरश्चंद्र सुतार यांनी पोस्ट कार्यालय येथे पोस्टमास्तर दत्तात्रय कोकणे यांनी तर सार्वजनिक वाचनालयात मनद सचिव राजेंद्र सुतार यांनी ध्वजारोहन केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी संस्था संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम.जरे, डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, प्रा.जी.जी.गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी एन.सी.सी.कॅडेट्सनी संचलन केले.

पुढारी | पुणे, शनिवार १८ ऑगस्ट २०१८ | २

## राजगुरुनगरला प्रभातफेरी काढून जनजागृती

**राजगुरुनगर :** राजगुरुनगर शहर व परिसरात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा झाला. तहसील कार्यालयात प्रांताधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.पंचायत समितीमध्ये सभापती सुभद्रा शिंदे, नगपरिषदेत आणि हुतात्मा राजगुरू वाड्यावर नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील आणि महात्मा गांधी विद्यालयात डॉ. प्रदीप शेवाळे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून देशभक्तीपर घोषणा दिल्या.



राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख